# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१/२०२५** **दिनांक २०/०१/२०२५**

**स्थळ-जिल्हा न्यायालय,अहिल्यानगर** **वेळ- दुपारी ०३.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा बुधवार दि.१५.०१.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०४/३५११/२०२५ दि.१०.०१.२०२५ रोजीचे पत्रान्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते. तथापी सदरहु सभा काही अपरिहार्य कारणास्तव तहकुब करण्यात आली होती. सदरहु सभा **सोमवार दि.२०.०१.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर** येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.क्र.स्वी.स./एसएसएसटी/०८/२०२५, दि.१७.०१.२०२५ रोजीचे पत्रान्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **सोमवार दि.२०.०१.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर** येथे मा.श्रीमती अंजु शेंडे (सोनटक्के) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्रीमती अंजू शेंडे (सोनटक्के),**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्षा, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१ दि.२९.११.२०२४ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१ दि.२९.११.२०२४ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२ चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचुन कायम करणे.**

**१. सन २०२४-२५ करीता तातडीने गाईचे शुध्द तुप खरेदीकामी दरपत्रके मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.२/१ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**२. आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेवून शासनास सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२/२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**३. आयकर कायदयातील तरतुदीन्वये सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाचे विनियोगाबाबत.**

**निर्णय क्र.२/३ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**४. संस्थानचे विविध विभागांसाठी सन २०२५-२६ करीता किराणा माल, गाईचे शुध्द तुप, दुध, पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर, पेपर पिशवी व इतर अनुषंगीक माल/साहित्य खरेदीकामी खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२/४ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-भांडार विभाग)**

---

**५. श्रींचे समाधी मंदिरातुन निघणारे हार व फुले या निर्माल्यांची विल्हेवाट लावणेकामी ई-निविदा प्राप्त उच्चतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२/५ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-बगीचा विभाग)**

---

**६. संतकवी श्री दासगणू महाराजांच्या पुण्यतिथीऐवजी जन्मतिथीचे दिवशी संस्थानचे वतीने वस्त्र व पुष्पहार पाठविणेबाबत.**

**निर्णय क्र.२/६ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला. (कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**७. श्री साई भक्तांच्या प्रसाद भोजन सुविधेसाठी साई प्रसादालयास सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता लागणारा भाजीपाला खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२/७ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला. (कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**८. संगणक दुरुस्ती देखभाली अंतर्गत आवश्यक संगणकीय व अनुषंगीक साहित्य खरेदी करणेसाठी वार्षिक दरकरार निश्चित करणेकामी राबविणेत येत असलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निम्नत्तम दरधारक निविदाकार यांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२/८ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला. (कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.३** **सन २०२५-२६ करीता श्री साई प्रसादालयातील अ) हाऊसकिपींग /स्वच्छता, पेस्ट कंन्ट्रोल करणे, वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणे, ब) अन्नपाकीटे बनविणेकामी तसेच क) स्वामीनारायण चपाती बनविणेकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३** **प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सी.ए.दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय/विधी विभाग)**

---

**विषय नं.४** **सन-२०२५ करीता श्री साई प्रसादालयातील ग्लास व इतर भांडी धुणेसाठी लिक्विड सोप खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.५** **श्री साई प्रसादालयात मोफत देण्यात येणारे प्रसाद भोजन सशुल्क करणेबाबत.**

**निर्णय क्र.५** **तहकुब.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.६** **सन २०२४-२५ करीता तातडीने गाईचे शुध्द तुप खरेदीकामी दरपत्रकातील प्राप्त न्युनतम दरांबाबत.**

**निर्णय क्र.६** **अवलोकन करुन नोंद घेतली.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.७** **संस्थान कर्मचा-यांच्या गणवेषासाठी रेमंड कापड खरेदीकामी ई-निविदेतील प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.७** **प्रस्ताव नामंजुर. कापडाची गुणवत्ता निश्चीत करुन त्याप्रमाणे फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.८** **साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील जुने कॉट जाहिर लिलावाने विक्री करणेकामी करावयाच्या कार्यवाहीस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-साई आश्रम भक्तनिवास)**

---

**विषय नं.९** **साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा, द्वारावती भक्तनिवास व साईप्रसाद भक्तनिवास विभागाकरिता नवीन टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस गाद्या खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.९** **प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सी.ए.दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-साई आश्रम भक्तनिवास/विधी विभाग)**

---

**विषय नं.१०** **साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर धुणे / इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापुर चादर धुणे, चादर धुणे व गादीच्या खोळी धुणेकामी दैनिक वर्तमानपत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१०** **प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सी.ए.दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-साई आश्रम भक्तनिवास/ विधी विभाग)**

---

**विषय नं.११** **साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग, बगीचा पेस्ट कंन्ट्रोल फॉगींग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग,पेस्ट कंन्ट्रोल फॉगींग, स्वच्छता कामाकरीता दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.११** **प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सी.ए.दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-साई आश्रम भक्तनिवास/विधी विभाग)**

---

**विषय नं.१२** **सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व संस्थान रुग्णालये लॉण्ड्रीसाठी आवश्यक असलेले केमिकल/डिटर्जेंन्ट संयुक्त खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.१२ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-साईबाबा भक्तनिवासस्थान)**

---

**विषय नं.१३ साई धर्मशाळा मध्ये निवासासाठी येणा-या रुग्णांची व नातेवाईकांची निवासाची व्यवस्था हॉलमध्ये करणे व आर इमारतीचे वरील बाजुस साईभक्तांसाठी प्रसादालय सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.१३ फक्त निवासव्यवस्थेसाठीचा प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-साई धर्मशाळा)**

---

**विषय नं.१४ वार्षिक स्वच्छता साहित्य खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.१४ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**विषय नं.१५ संस्थानचे विविध १८ वाहनांकरीता नवीन टायर खरेदी करणेकामी दरपत्रके मागविणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१५ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-वाहन विभाग)**

---

**विषय नं.१६ दि. ०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६ या एक वर्ष कालावधीकरिता संस्थानकडील विविध प्रकारचे १०९ वाहनांचा विमा नुतनीकरण करणेकामी राष्ट्रीयकृत तसेच खाजगी विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणारे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१६ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-वाहन विभाग)**

---

**विषय नं.१७ नवीन फायर सल्लागार यांची नेमणूक करणेसाठी न्युनतम दरधारक मे.रेडक्रॉप्स फायर ॲण्ड सेफ्टी प्रा.लि. मुंबई यांना कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१७ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-फायर ॲन्ड सेफ्टी विभाग)**

---

**विषय नं.१८ संस्थानचे मंजुर पदांचे वर्गीकरणाबाबत.**

**निर्णय क्र.१८ सेवा प्रवेश नियम अंतिम झाल्यानंतर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१९ श्री.गोरक्षनाथ भाऊसाहेब मते, संस्थान कंत्राटी कर्मचारी, सरंक्षण विभाग यांची रुग्णालयीन विशेष पगारी रजा मंजूर करणेबाबत.**

**निर्णय क्र.१९ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२० विनापरवानगी गैरहजर कारणास्तव पुढील नेमणुक आदेश न दिलेल्या संस्थान कंत्राटी कर्मचा-यांनी पुनश्च: संस्थान सेवेत हजर करुन घेणेबाबत केलेल्या विनंती अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.२० अर्ज केलेल्या कर्मचा-यांची सुनावणी घेण्यात यावी. चौकशी करुन प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२१ शासन निर्णयास अनुसरुन संस्थान अधिकारी / कर्मचारी यांचे गणवेश शिलाई भत्त्यामध्ये वाढ करणेबाबत.**

**निर्णय क्र.२१ गणवेश शिलाईचे काम महिला बचत गटाकडून करुन घेता येईल, याबाबत प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२२ सॉफ्टवेअर प्रोग्रामर पदाचे एकत्रित मानधन वाढवून मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२२ मानधनावरील सर्व कर्मचा-यांचा एकत्रित प्रस्ताव कामगार विभागामार्फत सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/ कामगार विभाग)**

---

**विषय नं.२३ श्री.अविनाश विनायक कुलकर्णी, प्र.लेखाधिकारी, लेखाशाखा यांचे दि.०९.०४.२०२४ रोजीचे अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.२३ विभागाचे सुस्पष्ट अभिप्राय घेऊन फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२४ श्री. कैलास सोनाजी खराडे, (सेवानिवृत्त) प्र.लेखाधिकारी, लेखाशाखा यांचे दि.०१.०१.२०२४ रोजीचे अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.२४ विभागाचे सुस्पष्ट अभिप्राय घेऊन फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२५ श्री.कैलास सोनाजी खराडे, (सेवानिवृत्त) प्र.लेखाधिकारी, लेखाशाखा यांचे दि.२१.०३.२०२४ रोजीचे अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.२५ विभागाचे सुस्पष्ट अभिप्राय घेऊन फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२६ श्री.काकासाहेब पंढरीनाथ ढेमरे, लिपीक टंकलेखक, श्री साईबाबा हॉस्पीटल, यांचे दि.०५.०१.२०२४ रोजीचे अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.२६ विभागाचे सुस्पष्ट अभिप्राय घेऊन फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२७ श्री.विठ्ठल तुकाराम पवार, मदतनीस, श्री साईआश्रम भक्तनिवास यांचे दि.२१.०३.२०२४ रोजीचे अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.२७ विभागाचे सुस्पष्ट अभिप्राय घेऊन फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२८ श्री.सुर्यकांत केशव भोसले, प्र.वरिष्ठ लेखापाल, लेखाशाखा यांचे दि.२५.०३.२०२४ रोजीचे अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.२८ विभागाचे सुस्पष्ट अभिप्राय घेऊन फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२९ श्री.गणेश शिवाजी धाकतोडे, सहाय्यक शिक्षक, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांनी दि.१९.०२.२०२४ रोजी केलेल्या अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.२९ विभागाचे सुस्पष्ट अभिप्राय घेऊन फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३० श्री साई प्रसादालय परिसरात सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी या बॅंकेचे A.T.M. सुविधा सुरु करणेकामी जागा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.३० प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३१ श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना विविध व्यवसायाकामी जागा वापरास परवानगी /मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३२ शिर्डी शहरातील बिरेगाव शिव विकास योजना १८.० मि. रुंद (स.नं.२०६ व २०७) रस्त्याचे कामाबाबत एफएसआय/टीडीआर प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.३२ तहकुब.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३३ शिर्डी विमानतळावर कार्यरत असलेल्या २०० CISF सुरक्षा कर्मचा-यांना संस्थान मालकीचे मौजे निमगाव को-हाळे येथील साईधर्मशाळा इमारतीमधील डी विंग रहिवास प्रयोजनार्थ भाडेतत्वावर मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३३ हाऊसकिपींग व नियमीत भाडेवाढ या संदर्भाने करारनाम्यामध्ये उल्लेख करणेचे अधिन राहून प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३४ श्री.अभिजीत देविदास शिंदे यांना त्यांचे ऐतिहासिक वस्तु, शस्त्रास्त्रे, कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी संस्थान मालकीचे मौजे निमगाव को-हाळे येथील साईप्रसादालय इमारतीतील ७२०० चौ.फुट भाडेतत्वावर वापरावयास दिलेल्या जागेचे मुदतवाढ व मासिक भाडेबाबत.**

**निर्णय क्र.३४ देशभरातील भाविकांना शिवकालीन ऐतिहासिक वस्तु, शस्त्रास्त्रे, महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारसाची माहिती, प्रचार आणि प्रसिध्दी या कलादालनातुन प्राप्त होते. त्यामुळे सन २०१९ मधील प्रस्तावीत भाडे आकारणी व त्यावर दरवर्षी १० टक्के भाडेवाढ करुन येणारा दर आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चीत केलेला दर यापैकी जे जास्त असेल त्याप्रमाणे मासिक भाडे आकारणी करुन मुदतवाढ देण्यात यावी.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३५ संस्थानमार्फत लेबर व सिक्युरिटी ठेकदारामार्फत कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांना रजा व सुट्टया लागु करणेबाबत.**

**निर्णय क्र.३५ सहाय्यक कामगार आयुक्त यांचेकडून माहिती घेऊन फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.३६ श्री साईबाबांचे जीवन कार्याचा व्यापक स्वरुपात प्रचार व प्रसार करणेकामी कार्यगट स्थापन करणेबाबत.**

**निर्णय क्र.३६ श्री साई साहित्य संशोधन व प्रसार अभ्यास गट तयार करुन प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-जनसंपर्क विभाग)**

---

**विषय नं.३७ खाजगी बॅंकामध्ये संस्थानचे खाते उघडुन विविध सेवा घेणेसाठी संस्थान अधिनियमातील तरतुदींमध्ये बदल करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७ तहकुब. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.३८ माहे नोव्हेंबर-२०२४ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३८ नोंद घेतली. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.३९ M/s Terralogic Software Solutions Pvt. Ltd. व M/s Oasys Tech Solutions Pvt. Ltd. यांनी अनुक्रमे संस्थानचे अधिकृत वेबसाईट व सोशल मिडीया संदर्भातील अनुषंगीक कार्यवाही त्यांचेमार्फत विनामोबदला स्वरुपात करुन देणेबाबत ई-मेलव्दारे सादर केलेल्या प्रस्तावाबाबत.**

**निर्णय क्र.३९ तहकुब. (कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.४० संस्थान प्रकाशित विविध भाषेतील श्री साई सच्चरित ग्रंथ व इतर पुस्तकांचे पडताळणी (Proof Reading) कामी व साईभक्तांच्या संस्थान प्रकाशने विषयी प्राप्त सुचनांचे निरसन करणेकामी प्रत्येक भाषेतील साहित्य अभ्यासक साईभक्तांचा पॅनेल तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.४० भाषांतर करण्यापुर्वी साईलिला मासिकामध्ये लिहिलेल्या मजुकराचे वाचन करुन ज्याचे भाषांतर करणे आवश्यक आहे अशाच मजकुराचे भाषांतर करावे.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.४१ श्री साईनाथ रुग्णालय श्री साई धर्मशाळा येथे तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतर करणेबाबत.**

**निर्णय क्र.४१ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.४२ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकडे कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी नेमणूकीवर असलेले वैद्यकीय अधिकारी (आरएमओ व सीएमओ, दंत रोग तज्ञ), मॅनेजर व सहाय्यक जीव वैद्यकीय यंत्र अभियंता यांचे मासिक मानधनाबाबत.**

**निर्णय क्र.४२ मानधनावरील सर्व कर्मचा-यांचा एकत्रित प्रस्ताव कामगार विभागामार्फत सादर करावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल/कामगार विभाग)**

---

**विषय नं.४३** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज आऊटसोर्स पध्दतीने निम्नतम दरधारकाकडून करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.४३** **निम्नतम दरधारकासोबत प्रथम वाटाघाटी करावी आणि त्यानंतर त्यास कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४४** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी, पब्लीक रिलेशन मॅनेजर व एस.टी./ए.एच. फॉर बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट, व ज्यु. बायोमेडीकल इंजिनिअर यांना तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी दिलेल्या नेमणूकांचा कालावधी संपुष्टात आलेनंतर टप्प्या-टप्प्याने पुन्हा नेमणूका देणेबाबत.**

**निर्णय क्र.४४** **प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४५** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय विभागाकडे ठेकेदारामार्फत कार्यरत परिचारिका/ परिचारक (स्टॉफनर्स) तसेच सर्व पॅरामेडीकल स्टाफ यांचे दि.०७.१०.२०२४ रोजीचे बेमुदत कामबंद आंदोलन अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.४५** **मानधनावरील सर्व कर्मचा-यांचा एकत्रित प्रस्ताव कामगार विभागामार्फत सादर करावा.** **(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल/कामगार विभाग)**

---

**विषय नं.४६** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत परिचारक/परिचारीका यांचे पगारवाढ मिळणेचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.४६** **मानधनावरील सर्व कर्मचा-यांचा एकत्रित प्रस्ताव कामगार विभागामार्फत सादर करावा.** **(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल/कामगार विभाग)**

---

**विषय नं.४७** **श्री साईबाबा संस्थान रुग्णालयामध्ये व Previu Health PVT LTD यांच्या विद्यमाने श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयामध्ये कॅन्सर रुग्णांचे निदान व उपचार सुरू करणेबाबत.**

**निर्णय क्र.४७** **टाटा कॅन्सर हॉस्पिटल यांचेशी संपर्क साधुन प्रस्तावाबाबत विचार विनिमय करावा.** **(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४८** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१५,१७,०९५/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४८** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४९** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१८,६७,९९९/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४९** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५०** **संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव-२०२५ तसेच उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु.४३,८०,०३४/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास व याकामी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५०** **प्रस्ताव मंजुर. याकामी देणगीदार साईभक्त मिळणेसाठी संस्थानचे वेबसाईटवर आवाहन करण्यात यावे.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.५१** **संस्थानचे मौजे पांगरी, सिन्नर तालुका औद्योगिक वसाहत मर्या.सिन्नर (मुसळगाव) व पांढुर्ली, ता.सिन्नर तसेच येसगाव, ता.कोपरगाव पालखी थांब्याची दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम करणेबाबत.**

**निर्णय क्र.५१** **प्रस्ताव मंजुर. पालखी मार्गावर ठिकठिकाणी टॉयलेट, बाथरुम बांधणेबाबत प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.५२** **संस्थानचे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२५ पै.मध्ये श्री साईनाथ हायस्कुल सुरु असलेल्या ३७.१७ आर जागेवर श्री साईबाबा हॉस्पिटलचे विस्तारीकरण करणेसाठी आर्किटेक्ट/ सल्लागार यांची नियुक्ती करणेसाठी E-RFP (E-Request For Proposal) प्रस्ताव मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.५२ तहकुब.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५३ मौजे निमगाव को-हाळे येथील संस्थानचे नवीन श्री साईबाबा शैक्षणिक संकुल इमारतीचे पश्चिम बाजुने स्कुल बस व इतर वाहनांसाठी कॉक्रीट रस्ता करुन दोन्ही बाजुने फुटपाथ विकसीत करणे कामासाठी येणारे रु.१,०८,४७,०००/-मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५३ प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सी.ए.दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५४ मौजे निमगाव को-हाळे येथील संस्थान मालकीच्या साई धर्मशाळा (गट नं.१७२) परिसरातील डक्टवर Polycarbonate Transparent Plastic Roofing Sheet बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.५४ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५५ श्री साई प्रसादालय, लाडू प्रसाद निर्मिती विभागाकरीता अन्नदान कक्षाचे इमारतीवर नवीन पहिला मजला बांधकाम करणेबाबत.**

**निर्णय क्र.५५ प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सी.ए.दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५६ मौजे निमगाव को.येथील संस्थानचे धर्मशाळा परिसरातील अंतर्गत रस्त्याचे दक्षिण बाजुचे प्रवेशव्दार ते हेलिपॅड रोड या लांबीचे कॉक्रीटीकरण करणे कामासाठी येणारे रु.६९,०८,९१५/-मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच या कामासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देणे.**

**निर्णय क्र.५६ प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सी.ए.दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५७** **संस्थानचे साईनाथ मंगल कार्यालय व साई उद्यान लगतचे शिर्डी सर्व्हे नं.४/२ ब २ येथील केशव मंदिराचे जागेवर Tea Complex इमारतीचे बांधकाम करणेकामी आर्किटेक्ट राजेंद्र गट्टानी, अमरावती यांचे सादरीकरण पाहून याकामी येणा-या रक्कम रु.१.४४ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५७** **प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सी.ए.दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**
**(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.५८** **वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालीका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्र.१ (संस्थान) कामाचे ३ रे धावते देयक व ४ थे आणि अंतिम देयक म.जी.प्रा.विभाग, संगमनेर यांनी प्रमाणित केलेप्रमाणे ठेकेदार दि. इंडियन हयुम पाईप कं.लि.पुणे यांना अदा करणेसाठी मान्यता मिळणेस तसेच ठेकेदार यांनी मागणी केलेली अतिरिक्त रक्कम नाकारणेस व इतर अनुषंगीक बाबींवर निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.५८** **प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सी.ए.दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**
**(कार्यवाही-पाणीपुरवठा विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.५९** **शिर्डी संस्थान वाढीव पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.१ (सुधारीत) करीता सल्लागार मानवसेवा कन्सल्टंट, धुळे यांनी सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाचे सादरीकरण पाहून त्यानुसार प्रकल्पासाठी येणारे अपेक्षित अंदाजपत्रकीय खर्चास व प्रकल्पाचे कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता देणेविषयी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.५९** **तहकुब.** **(कार्यवाही-पाणीपुरवठा विभाग)**

---

**विषय नं.६०** **श्री साईबाबा संस्थानचे "एनर्जी ऑडिट आणि सेफ्टी ऑडिट" प्रस्तावित असल्याने एल ॲण्ड टी आणि सिमेन्स कंपनीचे १०२ नग एअर सर्कीट ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) बाबतचे कामकाज हे मागील वर्षाचे कार्यादेशातील दरानुसार पुर्ववत सुरु ठेवणेकामी मे. टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई यांना मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६०** **प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.६१** **मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार व मा.कार्यकारी अभियंता (विद्युत),सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांचे प्राप्त पत्रातील अभिप्रायानुसार श्री साईबाबा संस्थानचे विद्युत संबंधीत यंत्रणेचे ''एनर्जी ऑडीट व सेफ्टी ऑडीट'' कामी महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण(MEDA) यांनी अधिकृत केलेली एजन्सी मे.पॉवरकॉप, अहिल्यानगर यांनी देऊ केलेले निम्नतम दर तसेच श्री साईबाबा संस्थानमधील श्री साईनाथ हॉस्पिटल, द्वारावती भक्तनिवास, साई पालखी निवारा,श्री साई प्रसादालय येथील विविध विद्युतीकरणांच्या कामासाठी तज्ञ सल्लागाराची नेमणुक करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांमधील "एल-१" निविदाधारक मे.कंपास कन्संल्टन्सी इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, पुणे यांनी देऊ केलेले १.५१% (सर्व करांसहित) निम्नतम दर स्वीकारून त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६१ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.६२** **साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा भक्तनिवास करीता लोखंडी कॉट खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६२ प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सी.ए.दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**
**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग/विधी विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करण्यात आली.**

आयत्या वेळेचा
**विषय नं.१** **लेखाशाखा विभागामार्फत विद्युत विभागाचे सन २०१७ ते सन २०२३ अखेर चल मालमत्ता व सादिल/किरकोळ (Consumable Items) वस्तुंचे तपासणी अहवालावरुन जबाबदारी निश्चित करणे व गैरव्यवहार रकमेची वसुली करणे.**

**निर्णय क्र.६३ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

आयत्या वेळेचा
**विषय नं.२** **सन २०२५ ते २०२७ चे साईलीला व्दै.मासिके, अंक (मराठी व हिंदी/इंग्रजी) व वितरणासाठी पाकीटे छपाई करुन पुरवठा करणेकामी वाणिज्यीक ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत पात्र निम्नतम दरधारकांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामीच्या प्रस्तावाबाबत.**

**निर्णय क्र.६४ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३ संस्थान परिसरात साईभक्तांकरीता डिजीटल लगेज लॉकर्सची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.६५ तहकुब.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४ M/s Oracle Corporation यांचेमार्फत Oracle Database व Oracle ERP या प्रणालीचे कार्यान्वीत Licenses चे नुतनीकरण करुन घेणेबाबत.**

**निर्णय क्र.६६ तहकुब.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५ साईआश्रम भक्तनिवास विभागाकरीता उशी व खुर्ची खरेदी करणेकामी व साईबाबा भक्तनिवास विभागाकरीता खुर्ची खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६७ तहकुब.**

**(कार्यवाही-साईआश्रम भक्तनिवास विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६ साईआश्रम भक्तनिवास विभागाकरीता बेडशीट उशीकव्हरसह खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.६८ तहकुब.**

**(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.७** **नवीन वॉटर कुलर्स खरेदी करणेकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नत्तम दरधारक मे.कुल होम इंडिया, नवी दिल्ली यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६९ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

--------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.८** **श्री साई प्रसादालयातील जुने भाजीपाला कोल्ड स्टोअरेज बायबॅक करुन नवीन खरेदी करणेकामी प्राप्त निविदेतील निम्नत्तम दरधारक मे.एम.के. इंजिनिअर्स, नवी दिल्ली यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७० प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

--------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.९** **व्दारावती इमारत भक्तनिवास समोरील गार्डनमध्ये श्री साईभक्तांचे मनोरंजनाकरीता गार्डन स्पिकर व इतर तद्अनुषंगीक साऊंड सिस्टीम संबंधीत साहित्य संस्थानचे विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७१ तहकुब.**

**(कार्यवाही-ध्वनिक्षेपन व टेलिफोन विभाग)**

--------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **दि.०१.१०.२०२४ ते दि.३१.१२.२०२४ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणीकरीता प्राप्त झालेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.७२ धोरणाअभावी अर्ज निकाली काढण्यात यावे.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

--------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.११** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.६,६४,४९४/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७३ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२ साईभक्तांच्या सुविधेसाठी नगर-मनमाड रस्ता क्रॉसिंगकरीता अंडरपास करणेकामी सल्लागाराची नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.७४ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३ श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील गुरुस्थान समोरील तळघरात स्ट्रॉंगरुमध्ये बांधकाम करणेसाठी रक्कम रु.६७,६२,०००/-मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७५ तहकुब.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ संस्थानचे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२५ पै. मध्ये सुरु असलेले श्री साईनाथ हायस्कुल स.नं.१०९ मधील जुनी कन्या विद्या मंदिर व इंग्लिश मिडीयम स्कुल या जागेत स्थलांतर करणेबाबत.**

**निर्णय क्र. ७६ तहकुब. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५ बाहययंत्रणेव्दारे ठेकेदारामार्फत कार्यरत बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी यांचे वेतनवाढ तसेच रजा सुट्टया मिळणेचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.७७ तहकुब. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६ आयत्या वेळेची सुचना.**

**निर्णय क्र.७८ प्रसादालय व लाडू किचन मधील कर्मचा-यांची वैद्यकीय तपासणी करणेत यावी तसेच प्रसादालयात तयार होणा-या अन्न पदार्थ व उपयोगी साहित्य यांची तज्ञाकंडून गुणवत्ता तपासणी करण्यात यावी.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय/ लाडू प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७ आयत्या वेळेची सुचना.**

**जिल्हा सैनिक कल्याण निधीसाठी ध्वजदिनानिमित्त संस्थानकडून रक्कम रुपये एक कोटी अनुदान देण्यात यावे.**

**निर्णय क्र.७९ याबाबतचा सविस्तर प्रस्ताव संबधीत विभागाकडून घेण्यात यावा.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**वरील निर्णय क्र.१ ते ७९ सर्वानुमते घेण्यात आले.**

**यानंतर सायं. ०६.१५ वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-

**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-

**(सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-

**[श्रीमती अंजू शेंडे (सोनटक्के)]**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्षा, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**